असा. क्र. ७

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, फेब्रुवारी १५, २००६/माघ २६, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.—महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. ३०-३३

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी २००६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2006.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५६ चा मुंबई ४६. **आणि ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची तात्पुरती सुधारणा.

२. या अध्यादेशाच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम हा, जणू काही त्यातील कलम २ मध्ये, " रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी, " रुपये नऊशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून अंमलात येईल. १९५६ चा मुंबई ४६.

## निवेदन.

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या राज्याच्या आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये १५० कोटी एवढी आहे.

२. कापूस एकाधिकार प्रापण योजनेअन्वये, भांडवल निर्मिती करण्याकरिता अंशदान देणाऱ्या शेतकऱ्यांना १२ टक्के या दराने व्याजासह, रुपये ७६९ कोटी एवढी रक्कम परत करावयाची आहे. यापैकी, रुपये ३५० कोटींचा पहिला हप्ता तात्काळ उपलब्ध करून देणे अगत्याचे आहे. राज्यातील कापूस उत्पादकांना विशेष बाब म्हणून, २ हेक्टर या कमाल मर्यादेला अधीन राहून प्रति हेक्टर रुपये १,००० एवढे सहाय्य द्यावयाचे आहे. या प्रयोजनासाठी रुपये २०० कोटी एवढ्या निधीची आवश्यकता लागेल. त्याचप्रमाणे, राज्यातील विजेच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी, राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ (एन.टी.पी.सी.) (कवास, गांधार), टाटा पॉवर अ‍ॅन्ड कॅप्टिव्ह जनरेशन यांच्याकडून उच्च किमतीने वीज खरेदी करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाला रुपये ५९२ कोटी एवढी रक्कम अपेक्षित आहे. या प्रयोजनासाठी रुपये ३०० कोटी एवढ्या निधीची आवश्यकता लागेल. उक्त बाबींशिवाय तातडीच्या व अकल्पित स्वरूपाच्या खर्चाच्या अन्य काही बाबींवरही खर्च करावा लागेल. अशा बाबींवरचा खर्च भागण्यासाठी ९५० कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. खर्चाच्या या बाबी " नवीन सेवा " असतील आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक १३ मार्च २००६ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित बाबींकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पुरवणी मागणी व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या " नवीन सेवांवरील " खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. तथापि, या बाबींवरील खर्च हा तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा ही फक्त रुपये १५० कोटींची आहे. त्यापैकी, निकडीच्या स्वरूपाच्या विविध बाबींवरील खर्च भागविल्यानंतर, आकस्मिकता निधीमध्ये सध्या अदमासे रुपये १४९.९१ कोटी एवढी रक्कम शिल्लक आहे. उपरोल्लिखित बाबींवरील खर्च भागविण्याकरिता ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, पूर्वोक्त खर्च भागविण्याकरिता, सध्याच्या निधीमध्ये रुपये ८०० कोटींची तात्पुरती वाढ करून, आकस्मिकता निधीची मर्यादा रुपये ९५० कोटींची करणे इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात सुधारणा करण्याकरिता तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ फेब्रुवारी २००६.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. पी. गहरोत्रा,**
शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई